**प्रेसनोट दि. १२.१२.२०२३**

अभिजीत नारायण गोरड (खाजगी इसम) वय ३६ वर्षे, व्यवसाय शेती रा. उपाळे मायणी, ता. कडेगाव, जि. सांगली यांना ५०००/- रुपये लाच देताना पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे कडेगाव पोलीस ठाणेमधील अधिकारी असून अभिजीत नारायण गोरड (खाजगी इसम) यांनी कडेगांव पोलीस ठाणे येथे त्यांच्या भावा विरूध्द दिलेल्या तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करणेकरीता तक्रारदार यांना लाच घेण्याबाबत आग्रह करून लाच देणार असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. ०८.१२.२०२३ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०८.१२.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये अभिजीत नारायण गोरड (खाजगी इसम) वय ३६ वर्षे, व्यवसाय शेती रा. उपाळे मायणी, ता. कडेगाव, जि. सांगली यांनी त्यांनी कडेगाव पोलीस ठाणे येथे त्यांच्या भावाविरूध्द दिलेल्या तक्रारी अर्जावरून गुन्हा दाखल करण्याकरता तक्रारदार यांना ५०००/- रूपये लाच घेण्याचा आग्रह केल्याचे निष्पन्न झाले. तसेच दि. १२.१२.२०२३ रोजी यातील आरोपी अभिजित गोरड यांनी पंचासमक्ष ५०००/- रूपये लाच देत असताना त्यांना पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने अभिजीत नारायण गोरड (खाजगी इसम) यांचे विरुध्द कडेगांव पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार सलिम मकानदार, चंद्रकांत जाधव, प्रितम चौगुले, अजित पाटील, ऋषीकेश बडणीकर, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॅाट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली सत्यमेव जयते

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.